**प्रेस नोट**

दिनांक–३०/०६/२०२१

**३० हजार रूपये लाचेची मागणी केली म्हणुन महावितरण शाखा क्र. १ लातुर चे सहायक अभियंता शेख मन्सुर नजीर यांच्या विरूध्द गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांच्या हॉटेलच्या लाईटचे मिटर मधून विद्युत प्रवाह काढुन थेट लाईटचा वापर करून विज चोरी केली म्हणुन सहायक अभियंता शेख मन्सुर नजीर यांनी कारवाई न करणेसाठी ३०,०००/–रुपये लाचेची मागणी केली म्हणुन दिनांक २९/०६/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या कडे तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक २९/०६/२०२१ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांच्या हॉटेलच्या लाईटचे मिटर मधून विद्युत प्रवाह काढुन थेट लाईटचा वापर करून विज चोरी केली म्हणुन सहायक अभियंता शेख मन्सुर नजीर यांनी कारवाई न करणेसाठी ३०,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारदार ३०,०००/–रुपये लाचेची रक्कम घेवून आलोसे शेख मन्सुर नजीर, पद– सहायक अभियंता, वर्ग–२, नेमणुक– महावितरण कार्यालय लातुर शहर शाखा क्र १, रा. गरूड चौक लातुर यांना देण्याकरीता महावितरण कार्यालय लातुर शााख क्र १ येथे दिनांक २९/०६/२०२१ वं ३०/०६/२०२१ रोजी गेले असता शेख मन्सुर नजीर यांनी लाचेची रक्कम घेण्यास जाणुन बुजून टाळले आहे.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन गांधी चौक लातुर येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हाचा तपास पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणिक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, सपोउपनि संजय पस्तापुरे, पोह/लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकांत डांगे, पोना/मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, पोकॉ/संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोकॉ रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| १) मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :– मोबाईल क्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईल क्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३) कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४) बबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५) टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– १०६४ |
| ६) कार्यालयाचा फोन क्रमांक | :– ०२३८२–२४२६७४ |
| ७) Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८) Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९) Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर